तोंडापूर मध्यम प्रकल्प, ता. जामनेर, जि. जळगांव या प्रकल्पाच्या डाव्या बाजूकडील मातीधरणाच्या पोहोच रस्ता व निरिक्षण पथाच्या दुरुस्तीचे कामास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग,
शासन निर्णय क्रमांक: प्रमाप्र-२०१८ (प्र.क्र.१४९/२०१८/ सिं.व्य.(कामे)
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक: ०७/०५/२०१८.

<u>वाचा</u> :- कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांचे पत्र -

१. जा.क्र. मु अ /तापाविम / प्रशा-४/ ११५०सन २०१८, दि.५.०३.२०१८.
२. शासन निर्णय क्र. संकीर्ण - २०१६/२७/२०१६/लपा-०२,दि.२६.०५.२०१७.

<u>प्रस्तावना</u> :-

तोंडापूर मध्यम प्रकल्पाच्या डाव्या बाजूकडील मातीधरणाकडे जाण्यासाठी तोंडापूर फर्दापूर रस्त्यापासून पोहोच रस्ता आहे. सदर रस्ता डाव्या बाजूकडील मातीधरणाच्या निम्न बाजूस असलेल्या निरिक्षण पथास जोडतो. सदर पोहोच रस्ता व निरिक्षण पथाच्या पृष्ठाभागावर मोठमोठे खड्डे व चाकोऱ्या निर्माण झालेल्या आहेत. मोठे खड्डे व चाकोऱ्यामुळे धरणाच्या नियमित पहाणीसाठी येणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कार व तत्सम वाहनांना धरणस्थळी येण्यास अडथळा निर्माण होतो. तसेच येणाऱ्या वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. निरिक्षण पथावरील खड्डयांमुळे धरण परिसरातील शेतकरी मातीधरण माथ्यावरील रस्त्याचा वापर करतात. बैलगाडी व ट्रॅक्टर सारख्या वाहनांच्या वापरामुळे धरणाच्या संकल्पीत काटछेउात बदल होऊन धरणाच्या सुरक्षेस बाधा निर्माण होत आहे. वरील बाबींचा विचार करता सदर रस्त्याच्या १८०० मीटर लांबीच्या पृष्ठभागाचे दुरुस्तीचे काम करणे अत्यंत गरजेचे आहे जेणे करुन परिसरातील शेतकरी मातीधरण माथ्यावरील रस्त्याचा वापर करणार नाही.सदर कामाची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी, पाणी वापरसंस्थेने व लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी वेळोवेळी केलेली होती याअनुषंगाने संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये विभागास देण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन सदर दुरूस्तीच्या कामाकरीता विशेष दुरूस्ती प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

तोंडापूर मध्यम प्रकल्प, ता. जामनेर, जि. जळगांव तोंडापूर मध्यम प्रकल्पाच्या डाव्या बाजूकडील मातीधरणाच्या पोहोच रस्ता व निरिक्षण पथाच्या विशेष दुरूस्तीच्या कामांसाठी विशेष दुरूस्ती अंतर्गत संदर्भ क्र. १. येथील पत्रान्वये प्रस्तावित कामांच्या रू. ३६३८६४८.००/-, (६+६=१२%) for GST ३,४८,४०७.००,१% for Insurance ३ ६,३८६.००,२% for Cotengencies ७२,७७२.००अनुषंगिक खर्च रू. निरंक अशा एकूण रू. ४०,९६,२१५.००/- (रू.चाळीस लक्ष, शेय्यानऊ हजार, दिनशे पंधरा फक्त) एवढ्या खर्चाच्या प्रस्तावास संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये विभागास दिलेल्या अधिकारान्वये व आंतरवित्त सल्लागार तथा उप सचिव यांच्या सहमतीने खालील अटींच्या अधीन राहून सोबतच्या प्रपत्रानुसार प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१. शासन परिपत्रक क्र.प्रमा-२०१३/(७८५/१३)/सिं.व्य.(कामे), दि.१.०१.२०१५ मधील मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे अभिलेखे, ठेवणे व कार्यवाही करणे महामंडळावर बंधनकारक आहे.
२. शासन पत्र दि.४/०६/२०१६ अन्वये तपासणी सूचीतील मुद्दे आर्थीक निकष मा. राज्यपाल यांच्या निदेशानुसार २% मर्यादेत निधी खर्च करणे, दायित्व निर्मिती मर्यादेत राहण्यासाठी कामाचे दोन वर्षाचे नियोजन करणे याची संपूर्ण जबाबदारी महामंडळाची असेल.
३. यांत्रिकी विभागाकडून कामे करुन घेण्याबाबत प्रचलित शासन निर्णयानुसार योग्य ती कार्यवाही करावी.
४. अंदाजपत्रकात गृहीत धरलेले आराखडे/संकल्पने दरसूची बाहयबाबी व वहन अंतरे तपासून अंदाजपत्रकास सक्षमस्तरावर तांत्रिक मान्यता प्रदान करावी.
५. माती कामे व गवत झाडे/झुडपे काढण्याची कामे जलसंपदा विभागाच्या यांत्रिकी संघटनेकडे उपलब्ध मशिनरीने करावीत.
६. प्रस्तावीत कामांमुळे खोदकामातून उपलब्ध होणारे बांधकाम साहित्याचा पूर्णवापर करुन बचत साधावी.
७. कामाचा खर्च उपलब्ध अनुदानातून प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेत व नियोजित वेळेत पूर्ण करण्यात यावा.
८. सदरच्या कामांचा कार्यारंभ आदेश काढण्यापासून कामे पूर्ण होईपर्यंत त्रैमासिक प्रगती अहवाल शासनास सादर करावा. काम पूर्ण झाल्यानंतर त्याबाबतचे प्रमाणपत्र शासनास त्वरीत उपलब्ध करून द्यावे.

प्रस्तावित कामासाठी होणारा ४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यावरील भांडवली खर्च, (१२) उर्वरित महाराष्ट्र, (१२ (०३) तापी पाटबंधारे विकास महामंडळास भागभांडवली अंशदान (४७०१ जे १८५) या लेखाशीर्षाखाली करावा व मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

या कामास प्रदान करण्यात आलेली प्रशासकीय मान्यता सिं.व्य.(कामे) कार्यासनाच्या नोंदवहीमध्ये क्र. ०१ सन २०१७-१८ मध्ये नोंदविण्यात आलेली आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०५०७१६५२४१३८२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Atul Ashok Kapole

Digitally signed by Atul Ashok Kapole
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=797fcfe0bb4a86dd814129f50d05c1d249ea6f0acc364c6214f11ff7174bd5ef, serialNumber=ae2c4f4c985d3e984de94324901263d48766ec651dea49d652faf11a96aa98b5, cn=Atul Ashok Kapole
Date: 2018.05.07 17:00:23 +05'30'

(अ. अ. कपोले)
शासनाचे उप सचिव

सोबत: परिशिष्ट - अ

प्रत :-

१) मा. राज्यपाल यांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री यांचे कार्यालय,

३) मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष, विधानसभा, विधानभवन, मुंबई
४) मा.सभापती/उपसभापती, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई,
५) मा.विरोधी पक्षनेते, विधानसभा, मुंबई यांचे कार्यालय,विधानभवन, मुंबई,
६) मा.विरोधी पक्षनेते, विधानपरिषद , मुंबई यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई,
७) मा.मंत्री, जलसंपदा यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई,
८) मा. राज्यमंत्री, जलसंपदा यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
९) प्रधान सचिव (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक,जलसंपदा विभाग,मंत्रालय, मुंबई,
१०) सचिव (जसंव्य व लाक्षेवि) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
११) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा),महाराष्ट्र राज्य,मुंबई,
१२) महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा),महाराष्ट्र राज्य,नागपूर,
१३) कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव,
१४) मुख्य अभियंता तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव.
१५) आंतरवित्त सल्लागार व उपसचिव,जलसंपदा विभाग,मंत्रालय, मुंबई
१६) अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभ क्षेत्र विकास प्राधिकरण , जळगांव.
१७) कार्यकारी अभियंता, जळगांव पाटबंधारे विभाग, जळगांव.
१८) सिं.व्य.(कामे) कार्यासन संग्रहार्थ.

शासन निर्णय क्रमांक: प्रमाप्र-२०१८ (प्र.क्र.१४९/२०१८/ सिं.व्य.(कामे)/ सिं.व्य.(कामे)
दि. ०७/०५/२०१८ चे सहपत्र

Sr.No	**Particulars**	**Unit**	**Amount**
1	C'Works	Rs:-	3638648.00
2	Add (6+6=12%) for GST (on "C" works Amount excluding Royalty)	Rs:-	348407.68
3	Add 1% for Insurance (on "C" works Amount)	Rs:-	36386.48
4	Add 2% for Cotengencies (on "C" works Amount)	Rs:-	72772.96
5	Grand total	Rs:-	4096215.12
6	Say	Rs:-	4096215.00

Atul Ashok Kapole

Digitally signed by Atul Ashok Kapole
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=797fcfe0bb4a86dd814129f50d05c1d249ea6f0acc364c6214f11ff7174bd5ef, serialNumber=ae2c4f4c985d3e984de94324901263d48766ec651dea49d652faf11a96aa98b5, cn=Atul Ashok Kapole
Date: 2018.05.07 17:00:38 +05'30'

(अ. अ. कपोले)
शासनाचे उप सचिव